## अमरावती महानगरपालिका, अमरावती

## दिनांक ०३/०२/२०२५ रोजी प्राप्त तसेच

## दिनांक २४/०३/२०२५ रोजी मंजुर सर्वसाधारण सभा ठरावाची प्रत

### (प्रशासकीय विषय)

विषय क्रमांक २२० – अमरावती महानगरपालिका अग्निशमन विभागात फायरमन या पदावर कार्यरत कर्मचारी यांना दि. २८/२/२०२४ पुर्वी प्राप्त विनंती अर्जाचे अनुषंगाने महानगरपालिकेचे मालकीचे भुखंड देणे संबंधात धोरण निश्चित करणे बाबत.

ठराव क्रमांक २२० – सर्वसाधारण सभा दिनांक २०/६/२०१७, ठराव क्रमांक २५ अन्वये वर्ग 'ड' चे कर्मचारी तसेच वर्ग 'क' चे दिव्यांग कर्मचारी यांना महानगरपालिकेचे खुले भुखंड खरेदी करुन देण्याबाबतचे धोरण ठरविण्यात आलेली आहेत. अमरावती महानगरपालिकेच्या आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमास शासनाची दिनांक १ मार्च २०२४ रोजी मान्यता प्रदान झालेली असून त्यामध्ये वर्ग 'ड' मध्ये येणारी काही पदे ही वर्ग 'क' मध्ये आलेली आहेत. त्यामुळे पूर्वी 'ड' मध्ये असणा-या कर्मचा-यांना भुखंड देणे मध्ये अडचण निर्माण होत आहे. त्या अनुषंगाने अग्निशमन विभागातील काही पदाचा प्रताव धोरण निश्चिती करीता सभेसमोर सादर करण्यात आला

ही सभा सदहु विषयाचे अनुषंगाने, (१) अतिरीक्त आयुक्त १, (२) अतिरीक्त आयुक्त २ (३) उपायुक्त (प्रशा.), (४) सहा. संचालक नगर रचना अधिकारी, (५) मुख्यलेखापरिक्षक या अधिकारी वर्गाची एक समिती गठीत करीत आहे. समितीने, अमरावती महानगरपालिकेतील सर्वसाधारण सभा दिनांक २०/६/२०१७ चे ठराव क्रमांक २५ नुसार भुखंड मागणीची प्रकरणे तपासावीत तसेच अमरावती महानगरपालिकेचा आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम दिनांक १ मार्च २०२४ रोजी मंजुर झाल्याने किती अर्जदार कर्मचारी त्यापूर्वी 'ड' वर्गामध्ये होते; ज्यांनी महानगरपालिके मध्ये भुखंड मिळण्या बाबत अर्ज सादर केले होते व दिनांक १ मार्च २०२४ नंतर 'क' वर्गामध्ये समाविष्ट झालेत अशा प्रकरणांची शहनिशा व छाननी करुन एक सविस्तर प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीस्तव सादर करावा असे ठरविण्यात येत आहे.

स्वा./-
नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती

स्वा./-
प्रशासक
महानगरपालिका,अमरावती

नगर सचिव
अमरावती महानगरपालिका,
अमरावती